महाराष्ट्र शासन

अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकामभवन, सातारा

नागरिकांची सनद

दूरध्वनी क्रमांक :- 02162/234586
वेबसाईट :- www.mahapwd.gov.in
ई-मेल :- satara.se@mahapwd.gov.in

सूची

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
1	प्रस्तावना	4 ते 5
2	सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा या कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी	5 ते 6
3	मंडळ कार्यालयाची रचना	6
4	कार्यपुर्तीचे वेळापत्रक	6
5	माहितीची सुलभता, व खाजगीकरण.	7
6	कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.	7
7	जनतेच्या गा-हाण्याचे निराकरण व सनदीचा आढावा	7
8	जनसामान्यांच्या सूचना.	8
9	नागरिकांच्या सनदेची अंमजबजावणी	8
10	मुख्यालये दर्शविणारा तक्ता (परिशिष्ट – अ)	9
11	कार्यपुर्तीचे वेळापत्रक (परिशिष्ट - ब)	10 ते 11

सातारा जिल्हा नकाशा


सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा
सातारा जिल्हा
प्रमुख रस्ते व लोहमार्ग
० १५ ३०
किलोमीटर
उ
पुण्याकडे
पुण्याकडे
बारामतीकडे
महाडकडे
शिरवळ
खंडाळा
लोणंद
साखरवाडी
फलटण
धोम
वाई
सुरुर
पाचगणी
महाबळेश्वर
आदर्की
वाठार
पाचवड
केळघर
मेढा
ताथवडे
शिंगणापूर
पंढरपूर-सोलापूरकडे
पंढरपूर सोलापूरकडे
जरंडेश्वर
बुध
कोरेगाव
पुसेगाव
दहिवडी
म्हसवड
सा.बां. विभाग, सातारा
बामणोली
सातारा
सातारा रे.स्टे.
खटाव
रहिमतपूर
सा.बां. पश्चिम विभाग, सातारा
चाळकेवाडी
सज्जनगड
वडूज
पंढरपूर-सोलापूरकडे
औंध
पुसेसावळी
कलेढोण
मायणी
पाल
चिपळूणकडे
हेळवाक
पाटण
मसूर
मल्हारपेठ
विटा
कराड
सांगलीकडे
शेणोली
चांदोली
बंगळूरकडे
सांगलीकडे
तासगाव-सांगलीकडे
मिरज-बंगळूरकडे
सूची
राष्ट्रीय महामार्ग
प्रमुख रस्ते
लोहमार्ग
जिल्हा मुख्य ठिकाण
तालुका मुख्य ठिकाण
गाव

प्रस्तावना

सार्वजनिक बांधकाम विभागाला 150 वर्षाहून अधिक वर्षाची गौरवशाली परंपरा आहे. या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पुणे सा.बां.प्रादेशिक विभागाच्या कार्यक्षेत्रात अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, सातारा हे कार्यालय गेल्या 37 वर्षापासून यशस्वीपणे कार्यरत आहे. ऐतिहासीक वारसा असलेल्या सातारा शहरामध्ये सा.बां. मंडळाचे कार्यालय असून "बांधकाम भवन" येथे मुख्यालय आहे. या मंडळाच्या अखत्यारीतील राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्राकडील सार्वजनिक रस्ते, पूल, इमारतीची कामे, देखभाल दुरुस्तीची कामे यांचे सनियंत्रण या मंडळामार्फत केले जाते. 2001-21 रस्ते विकास योजनेप्रमाणे सन 2022 - 23 प्रमाणे राज्यक्षेत्राकडे राज्यमार्ग- 883.89 कि.मी., प्रमुख जिल्हामार्ग 3468.85 कि.मी. अशी या मंडळाकडे एकूण 4362.74 कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. तसेच 29428 े8.90 चौ.मी. क्षेत्रफळाच्या विविध खात्याच्या अनिवासी इमारती, 174755.20 चौ. मी. क्षेत्रफळाच्या निवासी इमारती आहेत. सातारा जिल्हयातील सा.बां.विभागाच्या दृष्टीने नागरिकांशी बांधीलकी जपण्यास सा. बां. मंडळ कटीबध्द आहे. ही बांधीलकी सा. बां.मंडळ, सातारा या सनदेव्दारे जाहीर करीत असून ती स्विकारीत आहे. हे मंडळ नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यांत बांधील आहे. सा.बां. विभागाने निर्धारीत केलेल्या व पतदर्शित केलेल्या सा.बां. सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपुर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानभूतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरीकासाठी ही सनद तयार करण्यांत येत आहे.

1) सा.बां. मंडळ साताराच्या अखत्यारीतील मार्गाची देखभाल दुरुस्ती, मानकाप्रमाणे करुन रस्त्याचा दर्जा उत्तम राखणे.

2) विभागातील शासकीय इमारतीची (कार्यालयीन व निवासी इमारती) बांधकामे खात्याने ठरवलेल्या मानकानुसार उत्तम दर्जाची व सुरक्षीत अशी करणे.

3) या मंडळाच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

4) या मंडळ कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

5) आपत्कालीन व्यवस्थेसाठी (जसे महापुरामुळे वाहेतुक बंद पडलेल्या रस्त्याची दुरुस्ती करुन वहातुक चालू करणे) तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

6) मंडळ कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

7) या मंडळ कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

8) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या मंडळ कार्यालयाच्या अखत्यारीतील मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.

9) कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या मंडळ कार्यालयाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

10) संगणकीकरणाबाबत या मंडळाच्या सर्व विभागाअंतर्गत कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

11) या मंडळातर्गत आवश्यक व अद्ययावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावर (बेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्ययावत करणे.

12) कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख नोंदवहीसह अद्ययावत करणे.

13) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

2) सा.बां. मंडळ, सातारा कार्यालयाची बांधीलकी व नागरिकांची जबाबदारी

*** सा.बां. मंडळ, सातारा कार्यालयाची बांधिलकी -**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना सा.बां. मंडळ, सातारा.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व मदतीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील. यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/प्रमाणपत्रे/ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके, नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

*** नागरिकांची जबाबदारी -**

1. शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
2. नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्णरित्या मिळावी.
3. नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
4. विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
5. सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

6. नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
7. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजीचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.
8. नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
9. नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

3) सा.बां. मंडळ, सातारा कार्यालयाची रचना.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंडळ स्तरावरील अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, सातारा कार्यालय शासनाने दि.17/10/1985 रोजी स्थापन केले आहे. सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा अंतर्गत कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सातारा / कार्यकारी अभियंता, सा.बां. (पश्चिम) विभाग, सातारा / कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा/ ही विभागीय कार्यालये असून त्यांचेकडे सातारा जिल्हयातील, त्यांच्या अधिपत्याखालील तालुक्यातील कार्यक्षेत येते. एकूण 3 कार्यकारी अभियंता, उप अभियंता 18 कार्यरत आहेत. अधीक्षक अभियंता यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा नागरिकांचे सनदेचे सुरुवातीला दर्शविण्यात आलेला आहे. कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा तक्ता (Chart) परिशिष्ट "अ" म्हणून सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून अशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते. प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून केले जाते.

4) मंडळातर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.

अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक.

सा.बां. मंडळ, सातारा कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती, तसेच रस्ते, पुल व इमारती आणि इतर कामाविषयीची माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट "ब") नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहीत फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकेल. नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

ब) माहितीची सुलभता.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in या बेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या मंडळांतर्गत माहितीचा तपशिल व आकडेवारीचा तपशिल जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

क) खाजगीकरण

विशेषत: शहरी भागाच्या विकास कामासाठी व मोठया प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण शासन स्तरावर ठरविले जाते. मंडळ कार्यालयांतर्गत खाजगीकरणाचे माध्यमातून पुर्ण झालेल्या प्रकल्पांची माहिती पृष्ठ क्र.7 वर देणेत आलेली आहे.

5) सा.बां. मंडळ, सातारा कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी "अपघात" निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पहाणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारणा टप्या टप्याने हाती घेण्यात येते. तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावले जातात जेणेकरुन रस्ते वहातुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

6) जनतेच्या गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सूचना.

अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण.

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य कांही गाऱ्हाणी मंडळांतर्गत कामाबाबत काही तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ- उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे तक्रार नोंदवावी व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून 7 दिवसांत करण्यांत येईल. गाऱ्हाणी /

तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यांत येत आहे. गा-हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा ई मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात.

ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन.

या मंडळाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सा. बां. मंडळ, सातारा अंतर्गत घेण्यांत येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

क) जनसामान्याकडून सूचना.

या खात्याच्या नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वत:हून कांही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

1) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी.

सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यांस मंडळ कार्यालय कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यांत येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यांत येतील. सा.बां. मडळ, सातारा खात्रीपुर्वक गुणवतेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ह्या मंडळ कार्यालयाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यांत येईल.

2) अ) मुख्यालये दर्शविणारा तक्ता (Chart)

ब) कार्यपुर्तीचे वेळापत्रक.

परिशिष्ट-अ

सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा

क्षेत्रीय कार्यालयाची माहिती - मुख्यालय दर्शविणारा तक्ता

राज्यक्षेत्र-

कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, सातारा	कार्यकारी अभियंता सा.बां.(प) विभाग, सातारा	कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प.विभाग, सातारा
1) उप अभियंता सा.बां.उप विभाग, सातारा	1) उप अभियंता सा.बां.उप विभाग, जावली मु.मेढा	1) उप अभियंता मा. प्र उप विभाग, कराड
2) उप अभियंता सा.बां.उप विभाग, कोरेगांव	2) उप अभियंता सा.बां.उप विभाग, कराड	2) उप अभियंता मा.प्र उप विभाग, फलटण
3) उप अभियंता सा.बां.उप विभाग, फलटण	3) उप अभियंता सा.बां.उप विभाग, (उत्तर) कराड	3) उप अभियंता मा.प्र उप विभाग, वाई
4) उप अभियंता सा.बां.उप विभाग, दहिवडी	4) उप अभियंता सा.बां.उप विभाग, वाई	
5) उप अभियंता सा.बां.उप विभाग, वडूज	5) उप अभियंता सा.बां.उप विभाग, पाटण	
6) उप अभियंता सा.बां.विभाग, खंडाळा	6) उप अभियंता सा.बां.उप विभाग, (दक्षिण) पाटण	
7) उप अभियंता सा.बां.(यांत्रिकी) उप विभाग, सातारा	7) उप अभियंता सा.बां.उप विभाग, महाबळेश्वर	
	8) उप अभियंता सा.बां. विशेष प्रकल्प उप विभाग, कराड	

परिशिष्ट 'ब'
कार्यपुर्तीचे वेळापत्रक

अ. क्र	कार्यसूची	कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी	कार्यपुर्तीचा कालावधी मर्यादा
1	कंत्राटदार वर्ग 5, 6 व 7 आणि बेरोजगार अभियंताचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग-अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण	अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, सातारा	30 दिवस
2	कंत्राटदार वर्ग 8 व 9 आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, नुतनीकरण इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग 7 मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण	कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सातारा/ सा.बां.(प) विभाग, सातारा	30 दिवस
3	विश्रांमगृहांचे आरक्षणपत्र	कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सातारा/ सा.बां.(प) विभाग, सातारा	7 दिवस शिवाय ऑनलाईन आरक्षणही उपलब्ध
4	रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना	कार्यकारी अभियंता, सा.बां.(प) विभाग, सातारा	30 दिवस
5	रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र	मुख्य अभियंता राष्ट्रीय महामार्गासाठी व अधीक्षक अभियंता इतर मार्गासाठी	30 दिवस
6	चलतचित्रपट गृहांचे योग्यता प्रमाणपत्र	कार्यकारी अभियंता, सा.बां.(प) विभाग, सातारा	15 दिवस
7	सरकारी इमारतीचे " ना उपलब्धता " प्रमाणपत्र	कार्यकारी अभियंता, सा.बां.(प) विभाग, सातारा	15 दिवस
8	सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता)	कार्यकारी अभियंता, सा.बां.(प) विभाग, सातारा	7 दिवस
9	सरकारी निवासस्थान मिळण्याबातचे प्रतिक्षा यादी क्रमांक.	कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सातारा	7 दिवस
10	सरकारी निवासस्थानी राहणा-या निवृत्त कर्मचा-यांच्या बाबतचे ना हरकत दाखले	कार्यकारी अभियंता	30 दिवस
11	रास्त भाडे प्रमाणभाडे प्रमाणपत्र	कार्यकारी अभियंता	15 दिवस
12	इमारतीच्या भाडयांचे निश्चितीकरण	कार्यकारी अभियंता	15 दिवस
13	इमारतीचे मूल्यनिश्चितीकरण	कार्यकारी अभियंता	30 दिवस

अ. क्र	कार्यसूची	कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी	कार्यपुर्तीचा कालावधी मर्यादा
14	माहिती अधिकारांतर्गत मागणेत आलेली माहिती.		
	सा.बां. मंडळ, सातारा	शासकीय माहिती अधिकारी तथा अधीक्षक (प्रशासन) व शासकीय माहिती अधिकारी (तांत्रिक) तथा सहा अभियंता श्रेणी-2 सा.बां.मंडळ, सातारा.	अर्ज प्राप्त झाले पासून 30 दिवसात
	सा.बां. विभाग, सातारा /(पश्चिम)विभाग, सातारा/ मार्ग प्रकल्प विभाग	शासकीय माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता	अर्ज प्राप्त झाले पासून 30 दिवसात
15	माहिती अधिकारांतर्गत प्राप्त अपिलीय अर्ज		
	अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, सातारा	अपिलीय अधिकारी तथा सहा.अधीक्षक अभियंता	अर्ज प्राप्त झाले पासून 45 दिवसात
	कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सातारा /(पश्चिम)विभाग, सातारा/ मार्ग प्रकल्प विभाग	कार्यकारी अभियंता	अर्ज प्राप्त झाले पासून 45 दिवसात
16	माहिती अधिकारांतर्गत दुसरे अपिल	शासन नियुक्त माहिती आयुक्त	दुसरे अपिल 90 दिवसात माहिती आयुक्त यांचेकडे करणे आवश्यक